बुधवार दि.११ सप्टेंबर२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३७५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# नेत्याच्या मुलाला वेगळा अन् सर्वसामान्यांना वेगळा न्याय का?

## नागपूर हिट अँड रन प्रकरणावरून सुषमा अंधारेंचा प्रशासनाला सवाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

नागपुरात रविवारच्या मध्यरात्रीच्या सुमारास भरधाव वेगाने धावणाऱ्या एका ऑडी कारने दोन अन्य कार आणि एका दुचाकीला धडक दिल्याचे प्रकरण समोर आले आहे. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या अपघाताच्या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असताना आता या घटनेला राजकीय वळण लागले आहे. अपघातातील ऑडी कार ही भाजप नेते आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाचीच असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे.

सुषमा अंधारे यांनी याबाबत ट्वीट केले आहे. त्या म्हणाल्या की, नागपुरच्या रामदास पेठ येथे घडलेलं हिट अँड रन चे प्रकरणामधील गाडीचा नंबर पोलिसांनी का नोंदवला नाही? माझा थेट आरोप आहे की, या गाडीमध्ये संकेत बावनकुळे हा चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा अपघातावेळी गाडीत होता. तर ही गाडी प्रताप कामगार यांच्या मालकीची असून गाडीचे मालकही ते आहेत. मात्र, अपघाताच्या वेळी पोलिसांनी गाडी नंबर नोंद करून कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात तसे झाले नाही. त्यामुळे या प्रकरणात वेगळा न्याय का दिला? गाडी आणि संबंधित लोकांना पोलिसांनी ताब्यात का घेतले नाही? एका नेत्याच्या मुलाला वेगळा न्याय आणि सर्व सामान्यांना वेगळा न्याय का? असा सवाल अंधारे यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, या प्रकरणावर आता स्वत: भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहे. यावेळी बावनकुळे म्हणाले की, या अपघातातील गाडी माझ्या मुलाच्या नावावर आहे. पोलिसांनी या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करावी. पोलिसांनी या प्रकरणी कोणालाही वेगळा न्याय देता कामा नये. किंबहुना, जे जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले पाहिजे. परमेश्वराच्या कृपेने या अपघातात कोणीही जखमी झालेलं नाही.पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. सीसीटीव्ही फुटेज तपासावे. तसेच याबद्दल मी कुठल्याही पोलिस अधिकाऱ्यांशी आतापर्यंत बोललेलोही नसल्याचेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. त्यामुळे आता या प्रकरणाच्या तपासत काय माहिती पुढे येते आणि दोषींवर नेमकी काय कारवाई केली जाते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.



### माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे यांच्या हस्ते

## दिगांबर वाघमारे यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



महात्मा फुले प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिगांबर वाघमारे यांच्या शैक्षणिक सामाजिक कार्याची दखल घेऊन शिक्षक दिनाच्या औचित्याने युवा महाराष्ट्र फाउंडेशन आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्या निमिताने आज दि.१० सप्टेबर रोजी जेष्ट स्वातंत्र सेनानी माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे यांच्या हस्ते कंधार येथील संपर्क कार्यालयात महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ देऊन गौरविण्यात आले.

गेल्या २४ वर्षापासुन दिगांबर वाघमारे यांचे शैक्षणिक कार्य चालू आहे. संत गाडगेबाबा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डी. एन. केंद्रे, सचिव चेतन भाऊ केंद्रे, माजी नगराध्यक्षा तथा संचालिका अनुराधा केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कंधार येथिल महात्मा फुले प्राथमिक शाळेत ते मुख्याध्यापक म्हणून कार्य बजावत आहेत. तसेच ते सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय काम करत आहेत.

या सर्व कार्याची दखल घेऊन पुणे येथिल युवा महाराष्ट्र फाउंडेशन च्या वतीने दिल्या जाणारा महाराष्ट्र गौरव पुरस्कार शिक्षक दिनी जाहीर करण्यात आला होता.आज दि.१० सप्टेंबर रोजी सदर पुरस्काराचे भारतीय टपाल द्वारे कंधार येथे पार्सल मिळताच जेष्ट स्वातंत्र सेनानी माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे यांच्या हस्ते आणि येथिल पत्रकार बांधवाच्या प्रमुख उपस्थिती महात्मा फुले प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिगांबर वाघमारे यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ देऊन गौरविण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.वैजनाथराव कुरुडे,प्रा.डॉ गंगाधर तोगरे,पत्रकार मिर्झा जमीर बेग,पत्रकार माधव भालेराव,पत्रकार महमद सिंकदर,निलेश गायकवाड, माणिक बोरकर यांची उपस्थिती होती.

### आ.आजबे यांच्या प्रयत्नाला यश

## कृषीमंत्री मुंडे यांनी आष्टीला पाच कोटी ७५ लक्ष रुपयाचे कृषी भवनाला दिली मंजुरी-आ.आजबे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



शेतकऱ्यांसाठी विविध योजना महाराष्ट्र राज्य कृषी विभागा अंतर्गत तालुका कृषी अधिकारी कार्यालय मार्फत राबवल्या जातात त्यासाठी एकाच छताखाली सर्व अधिकाऱ्यांचे कार्यालय असावे व शेतकऱ्यांची हेडसांड होऊ नये या बाबींची दखल घेत आ बाळासाहेब आजबे यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय व कृषीभवनासाठी कृषिमंत्री ना धनंजय मुंडे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता त्यास आज पाच कोटी ७५ लाख रुपयांच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली याबद्दल शेतकरी बांधवांच्या वतीने आपण उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषीमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे विशेष आभार मानण्यात आले आहेत.

आष्टी तालुक्यासाठी अद्यावत तालुका कृषी भावन असावे असे आपले स्वप्न आहे त्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याचे सूचित केले होते त्यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार कृषिमंत्री नामदार धनंजय मुंडे साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून ९ सप्टेंबर २०२४ रोजी कृषी विभागाच्या वतीने पाच कोटी ७५ लाख रुपये च्या प्रशासकीय मान्यता आदेश काढण्यात आला आहे यामध्ये तालुका कृषी अधिकारी कार्यालय मंडळ अधिकारी कार्यालय व कृषी भवन शेतकऱ्यांसाठी या ठिकाणी सर्व सोईयुक्त असे कृषी भवन बांधण्यात येणार आहे यामध्ये शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग व इतर संग्रहालयाचाही समावेश करण्यात येणार आहे ,शेतकऱ्यांसाठी झटणारे शेतकरी पुत्र म्हणून आमदार बाळासाहेब आजबे यांची ओळख असणारे कर्तव्यदक्ष आमदार आजबे यांनी पुन्हा एकदा शिक्का मोर्तब केले आहे, लवकरच या कामाची निविदा प्रसिद्ध होऊन कामास सुरुवात होणार आहे त्यामुळे अधिकाऱ्यांबरोबरच शेतकऱ्यांना विविध सुविधा या एकाच छताखाली मिळणार आहेत शेतकऱ्यांसाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबवल्या जाणार असून त्यामध्ये सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे असे शेवटी आ आजबे यांनी बोलतांना सांगितले.

## गणेश मित्र मंडळाच्या वतीने सर्व पत्रकारांच्या उपस्थितीत श्रीगणेशाची आरती करून सर्व पत्रकार नतमस्तक



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी येथील खडकत चौक येथे गणेश मित्र मंडळाच्या वतीने सर्व पत्रकारांच्या उपस्थितीत श्री गणेशाची आरती करण्यात आली

यावेळी जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सरपंच परिषदेचे राज्य अध्यक्ष दत्ता काकडे,शरद रेडेकर,अविनाश कदम,अविशांत कुमकर,प्रवीण पोकळे,गणेश दळवी,राजे संभाजी उद्योग समूहाचे अध्यक्ष अमोल राजे शिंदे,सतीश जगदाळे चेअरमन, पत्रकार शेख निसार,पत्रकार जावेद पठाण,पत्रकार अण्णासाहेब साबळे,पत्रकार अक्षय विधाते,पत्रकार संतोष नागरगोजे,पत्रकार शेख समीर राजेंद्र लाड सर यांच्यासह श्री.गणेशाची आरती करून सर्व पत्रकार नतमस्तक झाले यावेळी खडकत चौक गणेश मित्र मंडळाचे बिबीशन भवर सरपंच,कृष्णा तवले अध्यक्ष,राहुल सोले उपाध्यक्ष

अक्षय सुपेकर सचिव,विनायक पन्हाळकर,रामदास खिळे, प्रकाश शिंदे,परमेश्वर शेवाळे,सलीम पठाण,गौरव केरूळकर,ओंकार केरूळकर, निहाल पठाण,शाहरुख पठाण,जालिंदर कुमकर,सागर खोसे रितेश बोराडे,रोहित वांढरे,मोहन पन्हाळकरलक्ष्मण पांडुळे आदी उपस्थित होते.

## गुरुवारी होणाऱ्या शिवसेना नेते खा.संजय राऊत यांच्या सभेला सर्व जनतेनी उपस्थित रहावे - रूद्रा पाटील भोस्कर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



लोहा -कंधार विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना उबाठा पक्षाचे संभाव्य उमेदवार तथा शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ व शिवसंवाद मेळाव्यास लोहा शहरात दि.१२ सप्टेंबर रोजी राधाई मंगल कार्यालयात सकाळी ११वाजता शिवसेनेची मुलुख मैदानी तोफ फायर ब्रॅण्ड शिवसेना नेते खासदार संजय राऊत येणार येणार असून त्यांच्या या जाहीर सभेला लोहा शहर व तालुक्यातील सर्व जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेनेचे रुद्रा पाटील भोस्कर यांनी केले आहे.

रुद्रा पाटील भोस्कर यांनी पुढे असे नमूद केले की, राज्यात व देशात प्रचंड प्रमाणात महागाई, बेरोजगारी वाढली आहे महिला भगिनीं सुरक्षित नाहीत शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही हे सगळे बदलण्यासाठी तसेच लोहा -कंधार मतदार संघात आता परिवर्तन होणार असून जनता दाजी भावजीच्या व घराणेशाही च्या राजकारणाला कंटाळली आहे.

लोहा -कंधार मतदार संघ विकासापासून कोसो दूर गेला आहे आता लोहा -कंधार मतदार संघात परिवर्तन करण्यासाठी जनतेनी ठरविले आहे आब की बार एकनाथ दादा पवार आमदार करण्यासाठी व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हात मजबूत करण्यासाठी लोहा येथे दि. १२ सप्टेंबर रोजी राधाई मंगल कार्यालयात सकाळी ११वाजता शिवसेनेची मुलुख मैदानी तोफ शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांची सभा होणार असून या सभेला सर्व जनतेनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेनेचे रुद्रा पाटील भोस्कर यांनी केले आहे.




### चारोळी

गौराईच्या पाऊलांनी
लक्ष्मी घरा येईल
सुखसमृद्धी आरोग्य
भरभरून देईल.

रंजना सानप
मायणी (सातारा)



बीड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदी समंदर खान साहेब यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा सत्कार करताना. क्रांतीकारी शिक्षक संघटनेचे संस्थापक तथा राज्य सचिव शाहिद कादरी सर, आजीज राजा सर, गायकवाड सर, आसरार खान सर, मुफ्ती तवक्कल साहब, प्रा.ताजुद्दीन सर, हुजिर सर, डॉ परवेज व इतर सर्व मित्र परिवार

## व्यंकटेश नगर व इस्लामपूर भागात स्मशान भूमी साठी जागा उपलब्ध करून द्या

### मुख्यधिकारी निलम काबंळे याच्याकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । साहेबराव दुगाने**

उमरी शहरातील व्यंकटेशनगर व इस्लामपूरा भागात वाढती लोकसंख्या प्रमाणे स्मशानभुमीची अंत्यत अवश्यक आहे. या नगरात गणेश नगर,आंबेडकर नगर,आनंदीबाई नगर,इस्लामपूरा नगर ,आधी असून हा भाग रेल्वे पटरीच्या पलीकडे स्मशानभूमीला जाण्यासाठी रेल्वेमार्गावरून रेल्वेगेट पटल्याने अंतिविधी करण्यासाठी प्रेताची अवहेलना होत असल्याने त्याच भागात उमरी-सावरगाव रोड वरील दत्तमंदिर शेजारील किंवा हुतात्मा स्मारक शेजारी असलेल्या शासकीय जागेवर स्मशानभुमीची जागा उपलब्ध करून द्यावे अशी मागणी जिल्हा उपाध्यक्ष संरक्षण समिती व सामाजिक कार्यक्रत्य सोनू वाघमारे यांनी उमरी नगर परिषदेचे मुख्यधिकारी निलम काबंळे यांना निवेदनद्रवारे मागणी केली आहे.यावेळी निवेदन देतांना पाडुरंग सोनकाबंळे, प्रल्हाद हिवराळे,फिरोज पटेल,राजेश सवई आधी होतो.



# जीवनात वाचनाला स्थान असावे..

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

वाचन हा आपला जीवनाचा महत्त्वाचा भाग असावा, कारण पुस्तकं असोत किंवा ई-बुक्स, वाचनामुळे अनेक फायदे मिळतात जे वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यातही सकारात्मक बदल घडवू शकतात. काही जणांना छापील पुस्तकांचे अनुभव आवडतात तर काहींना ई-रीडरद्वारे वाचणे सोयीचे वाटते.

वाचन करण्याचे फायदे

वरीप्रमाणे दोन्ही पद्धतींनी वाचन करण्याचे फायदे अनंत आहेत. चला, वाचन का आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग असावा याचे *१२ कारणं* पाहूयात, ज्यात छापील आणि डिजिटल दोन्ही प्रकारच्या पुस्तकांचा समावेश आहे:

**१. ज्ञानाचा महामार्ग:** पुस्तकं असो किंवा ई-बुक्स, वाचन हा ज्ञानाचा एक प्रचंड साठा आहे. वेगवेगळ्या विषयांवरील माहिती - इतिहास, विज्ञान, तत्वज्ञान किंवा कल्पनाविश्वातील गोष्टी - यांचा समावेश वाचनातून होतो. छापील किंवा ई-बुक्समध्ये वाचून तुम्ही नवीन छंद शिकू शकता, विविध संस्कृतींचा अभ्यास करू शकता आणि अनेक नव्या गोष्टी शिकण्याची संधी मिळवू शकता.

**२. शब्दसंग्रहाची वृद्धी:** छापील कादंबऱ्या किंवा ई-बुक्स वाचल्याने आपल्याला विविध शब्दसंग्रहाची ओळख होते. जितके जास्त वाचाल, तितके अधिक शब्दांशी तुमचा परिचय होईल, ज्यामुळे संवाद कौशल्ये अधिक सुधारतील आणि तुम्ही विचार स्पष्टपणे मांडू शकाल.

**३. स्मृतीवृद्धी:** वाचन, ते छापील असो किंवा ई-बुक स्वरूपात असो, स्मृती आणि बुद्धिमत्तेची कार्यक्षमता सुधारण्यासाठी उपयुक्त आहे असे संशोधनातून सिद्ध झाले आहे. कथेतील पात्रं, कथानक, आणि लहान मोठ्या तपशीलांचा मागोवा ठेवताना स्मृतीला मदत होते, आणि हे मानसिक व्यायाम दोन्ही प्रकारच्या माध्यमांमध्ये सारखेच आहे.

**४. तणाव कमी करणं:** चांगल्या पुस्तकाच्या पानांमध्ये हरवून तणाव कमी करण्याचा एक उत्तम उपाय आहे. कथा वाचणे किंवा माहितीपूर्ण लेखन वाचल्याने रोजच्या चिंतांपासून सुटका होते आणि एक मानसिक विश्रांती मिळते. छापील पुस्तकांच्या अनुभवात एक प्रकारची आरामशीर भावना असते, तर ई-बुक्स तुम्हाला कुठेही आणि केव्हाही वाचनाची सोय देतात, ज्यामुळे तणाव कमी होतो.

**५. लक्ष आणि एकाग्रता वाढवणे:** आपल्या तंत्रज्ञान-शासित वेगवान जगात लक्ष केंद्रित करणे एक मोठं आव्हान असतं. छापील किंवा ई-बुक्समधील दीर्घ कथेतील तपशील वाचताना एकाग्रता आणि लक्ष केंद्रित करण्याची क्षमता सुधारते. ई-बुक्स वाचताना, इतर ॲप्स किंवा नोटिफिकेशन्सच्या विचलनांपासून स्वतःला दूर ठेवून वाचनावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते.

**६. सहानुभूती आणि दृष्टिकोन:** कथा वाचण्याने सहानुभूतीची वृद्धी होते, मग ते छापील पुस्तक असो किंवा ई-बुक्स असो. वेगवेगळ्या पात्रांच्या भूमिकेत स्वतःला पाहण्याने आपल्याला विविध दृष्टिकोन समजून घेण्यास मदत होते. यामुळे आपण अधिक भावनिकदृष्ट्या साक्षर होतो, आणि कोणतंही माध्यम याला बाधा आणत नाही.

**७. सृजनशीलतेची वृद्धी:** वाचनाने आपल्या मनाला नवीन कल्पनांशी आणि विचारांशी ओळख होते. कागदावरील किंवा स्क्रीनवरील सामग्रीने विचारांच्या नवीन प्रवाहाला चालना मिळते. वाचनातून निर्माण होणाऱ्या सृजनशीलतेमुळे तुमच्या जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यात नवे दृष्टिकोन मिळू शकतात.

**८. लेखन कौशल्य मजबूत होणं:** जितकं जास्त वाचाल, तितकं तुमचं लेखन कौशल्य सुधारत जातं. चांगले बांधलेले वाक्य, कथानकाचा ओघ, विविध लेखनशैली यांचा अभ्यास तुम्हाला तुमचं लेखन सुधारण्यात मदत करतो. हे छापील किंवा ई-बुक्स दोन्हीमध्ये लागू होतं, कारण वाचनाच्या माध्यमात नाही तर दर्जेदार सामग्रीमध्ये फरक आहे.

**९. झोपेची गुणवत्ता सुधारते:** झोपण्यापूर्वी वाचन केल्याने शरीर आणि मन शांतीत येतं, ज्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते. मात्र, छापील पुस्तकं ई-बुक्सपेक्षा अधिक उपयुक्त असतात, कारण स्क्रीनवरून निघणारा निळा प्रकाश झोपेच्या पॅटर्नवर परिणाम करतो. जर तुम्ही ई-बुक्स वाचत असाल, तर ई-इंक किंवा नाईट मोड वापरणं चांगलं ठरू शकतं.

**१०. सोय आणि पोर्टेबिलिटी:** छापील पुस्तकांनी जरी एक अद्वितीय अनुभव दिला तरी ई-बुक्सची सोय आणि पोर्टेबिलिटी हा एक मोठा फायदा आहे. ई-बुक्सद्वारे तुम्ही हजारो पुस्तकं एका छोट्या उपकरणात संग्रहित करू शकता, ज्यामुळे तुम्हाला कुठेही आणि केव्हाही वाचण्याची मुभा मिळते. त्यामुळे प्रवास असो किंवा दिवसाच्या कुठल्याही वेळेसाठी पुस्तकं तुमच्यासोबत असतात.

**११. सर्वांसाठी उपलब्धता:** डिजिटल वाचन सामग्री लोकांसाठी अधिक सुलभता निर्माण करते, ज्यांना कधी कधी छापील पुस्तकं वापरणं कठीण असू शकतं. ई-बुक्समध्ये फॉन्ट साइज बदलणे, टेक्स्ट-टू-स्पीच पर्याय, आणि पार्श्वभूमीचे रंग बदलणे असे पर्याय उपलब्ध असतात, जेणेकरून ज्यांना दृष्टिदोष किंवा शिकण्यात अडचणी असतात त्यांना वाचन सुलभ होईल.

**१२. पर्यावरणावर परिणाम कमी करणे:** ई-बुक्समध्ये छापील पुस्तकांच्या तुलनेत पर्यावरणावर कमी परिणाम होतो. ज्यांना पर्यावरणाची काळजी आहे त्यांच्यासाठी ई-बुक्स ही एक चांगली पर्याय ठरतात, कारण त्यात कागदाचा वापर कमी होतो आणि शिपिंग वा साठवणूक लागणार नाही.

निष्कर्षतः, पुस्तकं वाचणं - ते छापील असो वा डिजिटल असो - अनेक उपयुक्त फायदे आणते, जे वाचनाच्या आनंदापलिकडे जातात. शब्दसंग्रह सुधारण्यापासून ते तणाव कमी करण्यापर्यंत, आणि सहानुभूती वाढवण्यापर्यंत, वाचनाचे फायदे प्रचंड आहेत. कोणते माध्यम वापरावे याचा निर्णय वैयक्तिक आवडीनुसार असतो, परंतु जीवनात वाचनाला स्थान देणं अत्यंत महत्त्वाचं आहे. Whether you're flipping through the pages of a novel or scrolling through an eBook, the journey of reading is invaluable and worth pursuing.

**-डॉ. सुवर्णा भारत कराड,**
**प्रदेशाध्यक्षा वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य**

## वासुंदे येथील महापारेषाण च्या मनोऱ्याला धोका निर्माण करणाऱ्या खडी क्रेशरचा विज पुरवठा खंडित करा : मिनाज मुल्ला


### महापारेषाणच्या अधिकाऱ्यांना उप विभागीय अधिकारी मिनाज मुल्ला यांनी दिले आदेश

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड तालुक्यातील वासुंदे,जिरेगाव पांढरेवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात खाणमाफियांनी उच्छाद मांडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील खाणमाफीयांनी महापारेषण कंपनीची उच्च दाब वाहिनी २२० केव्ही बारामती-कुरकुंभ व कुरकुंभ-शिर्सुफळ या वाहिनीचा मनोरा क्रमांक ७४ व ७५ या ठिकाणी येथील खाणमाफियांनी मोठ्या प्रमाणात नियमबाह्य बेकायदेशीरपणे बोअर ब्लास्टिंग करून स्वहितासाठी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर उत्खनन केले आहे.

त्यामुळे येथील अतिउच्च वाहिनीचा मनोरा पडण्याच्या मार्गावर असल्याने तात्काळ संबंधित खडी क्रशरचा विज पुरवठा खंडित करण्याचे आदेश महापारेषणचे अनिल माळी यांना उपविभागीय अधिकारी मिनाज मुल्ला यांनी पत्रकार समवेत झालेल्या बैठकीमध्ये दि.१० रोजी दौंड येथे दिले आहेत.सदरच्या नियमबाह्य उत्खननासाठी महसूल प्रशासन जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. महसूल ने दिलेल्या परवानग्या,अटी-शर्ती याचा सर्वत्र भंग झालेला असताना या खाणमाफीयांना कोणाचे अभय आहे.हे मात्र गुलदस्त्यात आहे.येथे स्थानिकांच्या जिविताचा प्रश्न निर्माण झालेला असताना याबाबत जिल्हा खनीकर्म अधिकारी सुयोग जगताप मुग गिळून गप्प आहेत.त्यामुळे त्यांच्या कार्यप्रणालीवर शंका निर्माण होत आहे. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी तातडीने दखल घेण्याची गरज आहे.या उत्खननाने अती उच्चदाब विद्युत वाहिनीस धोका निर्माण झाला आहे.याबाबत महापारेषण कंपनीकडून धोक्याची नोटीस दिनांक ०५/०९/२०२४ रोजी अतिरिक्त कार्यकारी अभियंता अतिउच्चदाब वाहिनी देखभाल उपविभाग बारामती यांच्यामार्फत येथील कोहिनूर स्टोन क्रशर,ओम साई ओम क्रेशर,वासुंदे, पांढरेवाडी,जिरेगाव ग्रामपंचायत अंतर्गत येणारे सर्व खाण व्यवसायिक व क्रशर उद्योगांना देण्यात आले आहे.सदर नोटीसाची प्रत कार्यकारी अभियंता महापारेषाण संरक्षण व सुरक्षितता,विद्युत निरीक्षक, महाराष्ट्र शासन - पुणे,तहसीलदार दौंड,गाव



कामगार तलाठी - वासुंदे, जिरेगाव,पांढरेवाडी यांना देण्यात आले आहे.सदरचे नोटीस मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून सोशल मिडियावर शासकीय यंत्रणांवर नाराजीचा सुर उमटत आहे.या नोटीसामध्ये असे नमुद केले आहे की,सद्यस्थितीला अस्तित्वात असलेल्या मनोऱ्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूस साडे सतरा मीटर पर्यंत कोणतेही काम करता येत नाही.मात्र या ठिकाणी सर्व नियमांना खाण व्यवसायिकांनी कात्रजचा घाट दाखवत केलेल्या उत्खननामुळे विद्युत मनोऱ्याचा सापळा अधांतरी झाला आहे. यामुळे मोठ्या जिवितहानीचा धोका निर्माण झाला आहे.या खोदकामाबाबत महापारेषांच्या तपासणी व देखभाल दुरुस्ती करणारे अधिकारी कर्मचारी तितकेच जबाबदार आहेत.या मनोऱ्या जवळ उत्खनन झालेल्या घटनेची तात्काळ महापारेषाण कडून दक्षता घेतलेली नाही.त्यामुळे या कर्मचाऱ्यांवरती सेवेत दिरंगाई केल्याबद्दल व कर्तव्यात कसूर केल्याबद्दल वरिष्ठांनी कारवाई करण्याची गरज आहे.या कर्मचाऱ्यांच्या कसूराईमुळे महापारेषणचे कोट्यावधी रुपयांची वित्तहानी होणार असून जिवितहानीचाही धोका फार मोठा निर्माण झालेला आहे.त्यामुळे या संबंधित कर्मचाऱ्यांसह येथील नियमबाह्य बेकायदेशीर उत्खनन करणारे खाण मालक व क्रशर मालकांवरती गुन्हे दाखल करण्याची गरज असल्याचे प्रशासनातील बडे अधिकारी दबक्या आवाजात बोलत आहेत.या संपूर्ण घटनेची माहिती पत्रकारांनी विचारले असता देण्यास संबंधित सर्वच विभागातील अधिकारी टाळाटाळ करत आहेत.त्यामुळे महसूल व महापारेषण प्रशासन काय भूमिका घेते हे पाहणे गरजेचे आहे.

## माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील म्हणजे इंदापूर तालुक्यातील जनतेचे आधारवड-संपतराव बंडगर

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचा आधारवड म्हणजेच माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील आहेत,असे मत व्यक्त केले आहे भिगवण ता.इंदापूर येथील युवा उद्योजक संपतराव बंडगर यांनी ते पुढे म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की,शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.त्याच उद्देशाने,त्याच धर्तीवर हर्षवर्धन पाटील यांनी प्रथम शिक्षणाला प्राधान्य देत सर्वसामान्य गरीब कुटुंबातील मुला-मुलींना शिक्षणाची खरी गंगा पाटील यांनी इंदापूर तालुक्यात आणली.

आणि आज हजारो मुलं-मुली उच्च शिक्षण घेत पदवी घेऊन उच्च पदावर शासकीय सेवेत नोकरी करीत



आहेत.आणि युवा पिढीला खऱ्या अर्थाने स्वतःच्या पायावर उभे करून सक्षम युवा पिढी घडविण्यात भाऊंचा सिहांचा वाटा आहे.आणि हे सर्व लोकाभिमुख कार्य हर्षवर्धन भाऊंनी केले आहे.

मोठ्या भाऊंचा वारसा चालवत असताना शेतकऱ्यांचा उजनीच्या पाण्याचा प्रश्न असेल, साखर संघाच्या माध्यमातून इथेनॉल निर्मिती वरील बंदी उठवण्यासाठी पाठपुरवठा करणे असेल,दुध गंगा संघाचे माध्यमातून दूध उत्पादकांना न्याय व दर देण्याचे काम असेल,तलावातील मत्स्य बिज सोडून मच्छीमारांना न्याय देण्याचे काम असेल,गावोगावी पाणी पुरवठ्याच्या योजनांना हातभार लावण्याचे काम असेल,तालुक्यातील अनेक रस्त्यांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी आणण्याचे काम असेल,रक्तदान शिबिरातून गरजूंना मदत करण्याचे काम असेल,अशा अनेक लोकाभिमुख योजना राबवून तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम फक्त हर्षवर्धन पाटीलच करू शकतात.

आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून तालुक्यातील जनतेसाठी अहोरात्र त्यांच्या सोबत आज त्यांची दोन्ही मुलं राजवर्धन पाटील आणि अंकिता पाटील-ठाकरे हे देखील पायाला भिंगरी बांधून संपूर्ण इंदापूर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेसाठी काम करत आहेत.त्यामुळेच उद्याच्या २०२४ च्या विधानसभेला हर्षवर्धन पाटील हे इंदापूरचे आमदार होणारच आहेत,यात तिळ मात्र शंका नाही.म्हणूनच त्या अगोदर ते तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचे आधारवड आहेत.असे पत्रकारांशी बोलताना भिगवणचे प्रसिद्ध युवा उद्योजक संपतराव बंडगर म्हणाले.

## विठ्ठल नागोबा हिमगिरे राज्यस्तरीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**धर्माबाद । साहेबराव दुगान**

महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण परिषद च्या वतीने सन २०२४ चा राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळेतील शिक्षक श्री विठ्ठल नागोबा हिमगिरे यांना माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य मा.जयप्रकाशजी दांडेगावकर

मुख्य अतिथी गिरीश भाऊ जाधव प्रदेशाध्यक्ष कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र. परिषदेचे प्रदेश अध्यक्ष व्यंकटराव जाधव सर यांच्या हस्ते सपत्नीक प्रधान करण्यात आले यावेळी सोबत उपस्थित सौ दिपाली विठ्ठल हिमगिरे, मुख्याध्यापक प्राथमिक पानसरे हायस्कूल मठपती सर , असावार सर, साखरे शिवांजी सर , संजय झगडे, नागनाथ पा माळगे उपस्थित होते. प्रा. संतोष मगनळीकर,गोविंद येळगे .प्रभाकर कचकलवाड, साईनाथ तानुरकर, प्रा. व्यंकट परणे, शंकरराव परणे, साहित्यिक



नासा येवती कर, सर्पमित्र क्रांती बुध्देवार, दारमोड पांडुरंग, रमेश विभुते, सुनील जी लोकडे, व्यंकट भोगाजी, कवयित्री राजश्री विभुते हिमगिरे, इसाप प्रकाशन चे मालक दत्ता डांगे, मुख्याध्यापक माधवराव हडपे सर, श्री बारसे सर, संतोष सोमाचे . आश्रम शाळेचे मुख्याध्यापक सतीश जाधव सर. महसूल विभागाचे मंदार इंदुरकर साहेब. यांची उपस्थिती होती. संदीप पाटील जवळेकर, मारुती पाटील कागेरू. मा माजी सभापती ,शिवराज भाऊ,दत्ता कवडे, ललेश पाटील,साईनाथ साखरे ,किर्तनकार संघटनेचे अध्यक्ष मोहनराव गावडे गुरुजी, शिक्षक नेते बसापुरे वीरभद्र ,संदीप खेमशेट्टी, बसवराज चिवटे , हावगीराव दर्यापुरे , शेटकर बालाजी ,शंकर खपाटे, नागोराव पाटील

जारीकोटे सरपंच पाटोदा,सतीश पाटील, विश्वनाथराव रोशन गावकर , ॲड चक्रेश पाटील बनाळीकर, मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुदर्शन वाघमारे, माजी एन.सी.सी ऑफिसर जी पी मिसाळे सर, लक्ष्मण तुरेराव साहेब,सुरेश घाळे साहेब, संजय कदम साहेब,लखमावार पोतन्ना साहेब, कृष्णा तीमापुरे साहेब,गणेश वाघमारे साहेब, साहेब, अशोक पडोळे हनुमंते तर संस्थेचे पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा देऊन पुरस्कृत शिक्षकांचे कौतुक केले. पुरस्कार प्राप्त शिक्षक हिमगिरे सर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# एएससी कंपनीकडून गोरगरीब लोकांचे पैसे परत मिळवण्यासाठी सायबर विभागाने कठोर कारवाई करावी

## अन्यथा सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांची गृहमंत्र्यांकडे तक्रार करणार-माजी राज्यमंत्री सुरेश धस

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

एएससी या कंपनीने ऑनलाइन व्यवसाय द्वारा मासे विक्री आणि इतर प्रकारचे व्यवसाय अधिक पैसे मिळवण्याचे आमिष दाखवून गोरगरीब,छोटे-छोटे व्यवसायिकांना लुटले असून या व्यवसायिकांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी बीड जिल्हा सायबर क्राईम सेलचे अधिकाऱ्यांनी अधिक कार्यक्षमतेने आणि कठोरपणे कारवाई करण्याची आवश्यकता आहे..अशी जनतेची अपेक्षा असून..

त्यानुसार जिल्हा पोलीस दलातील सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा या संबंधित अधिकाऱ्यांची तक्रार आपण उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहोत असा इशारा माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी दिला... आष्टी पोलीस स्टेशन मध्ये पत्रकारांशी





ते बोलत होते..ते पुढे म्हणाले,एएससी या ऑनलाईन कंपनीद्वारे छोट्या व्यवसायिकांना मासे विक्री व्यवसायातून अधिक नफा मिळवण्यासाठी ऑनलाईन पैसे गुंतवण्याचे आमिष दाखवण्यात आले..त्यामध्ये तालुक्यातील १२०० ते १४०० लोकांचे प्रत्येकी ५ ते १० लाख रुपयापर्यंतची गुंतवणूक झाली असून आता त्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाली आहे.त्यातील अनेक व्यवसायिकांनी व्याजाने पैसे काढून गुंतवणूक केल्यामुळे आज त्यांच्यावर फाशी घेण्याची वेळ आलेली आहे..त्यामुळे सायबर क्राईम विभागाकडे काळे नावाच्या व्यक्तीने याबाबत रितसर फिर्याद दाखल केली असून त्या फिर्यादीनुसार संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी..आणि या गोरगरीब व्यवसायिकांचे पैसे मिळवण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलातील सायबर क्राईम विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक कार्यक्षमते आणि प्रामाणिकपणे काम करण्याची आवश्यकता आहे असे सांगत ते म्हणाले की,बीड जिल्ह्यातील महादेव प या महा घोटाळ्यातील नऊ नऊ अब्ज रुपये ज्या व्यक्तींच्या नावावर आर्थिक व्यवहार झालेला आहे त्या व्यक्तींपैकी अनेक जण उजळ माथ्याने फिरत आहेत..त्यांच्यावर सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांची मेहरबानी दिसून येत आहे.. सायबर विभागातील एक अधिकारी अनेक दिवसांपासून त्या ठिकाणी कार्यरत असून त्याची माहिती मी घेत आहे..

या गोरगरीब जनतेची फसवणूक करणाऱ्या व्यक्तींचा शोध होऊन त्यांना त्यांचे पैसे परत मिळवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात यावेत अन्यथा.. या सायबर विभागातील अधिकाऱ्यांची आपण राज्याच्या गृहमंत्र्याकडे तक्रार करणार आहोत असेही त्यांनी शेवटी सांगितले.

## बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करा

# शेतकऱ्यांना प्रत्येकी हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई व पिकविमा त्वरीत देण्यात यावा-कॉ.महादेव नागरगोजे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**


बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना प्रत्येकी हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई व पिकविमा त्वरीत देण्यात यावा. नसता दिनांक १९/१०/२०२४ गुरुवार रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता चुंबळी फाटा येथे चक्काजाम आंदोलन करण्यात येईल. असे निवेदन भारतीय कमनिष्ठ पक्ष व किसान सभा पाटोदा तालुका कौन्सिल यांनी उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड यांच्या मार्फत मा. ना.एकनाथरावजी शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना.धनंजयजी मुंडे, कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना दिले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या दोन महिन्यापासून जिल्ह्यात कमी जास्त फरकाने सतत पाऊस चालु असुन गेल्या २७ व २८ ऑगस्ट रोजी पाटोदा तालुक्यातील अंमळनेर मंडळाच्या काही भाग, पाटोदा व दासखेड मंडळाच्या काही भागात ढगफुटी होऊन शेतकऱ्यांचे संपुर्ण पिके जमीनीसहित वाहुन गेली आणि ०१ सप्टेंबर ते ०३ सप्टेंबर दरम्यान संपुर्ण बीड जिल्ह्यात ढगफुटी होऊन शेतकऱ्यांच्या पिकासहीत जमिनी वाहुन गेल्यात, मनुष्य व वित्तहानी झाली. जिल्ह्यातील ६२ मंडळात शेतकऱ्यांची सोयाबीन, कापुस, उडीद, मुग इत्यादी पिक उध्दवस्त झाली. या २०२४ च्या खरीप पिकाचे शेतकऱ्याची पुरती वाट लागली. वार्षिक सरासरी पेक्षा दोन महिन्यातच जास्त पाऊस झालेला असल्यामुळे मात्र महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार नुसते बघ्याची भुमिका घेऊन पोकळ आश्वासनाची खैरात केली जात आहे. या महाराष्ट्राचे कृषीमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मात्र शेतकऱ्यांना ३१ ऑगस्ट पर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रति हेक्टरी ५ हजार रुपये नुकसान भरपाईचे जमा करु असे म्हणाले ते अनुदान आता १० सप्टेंबर पर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करु अशी खोटी आश्वासने हि सरकार देत आहेत. खुद्द पालकमंत्र्याच्या मतदार संघात आत्ता पर्यंत दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. खरे तर हे नुकसान भरपाईचे अनुदान सन-२०२३च्या खरीप नुकसानीच्या पिकाचे आहे ही महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्याची केलेली शुध्द फसवणुक आहे. खरे तर शेतकऱ्याला सन- २०२३ चा राहिलेला ७५% खरीप पिक विमा देण्याऐवजी शेतकऱ्याला प्रती हेक्टरी ५ हजार रुपये नुकासन भरपाईचे गुलाबी गाजर दाखवुन शेतकऱ्याची शुध्द फसवणुक चालवलेली आहे. शेतकऱ्याला सन-२०२३ चा खरीपचा २५% अग्रीम पिक विमा दिला आता राहीलेला ७५% पिक विमा देणे गरजेचे असतांना महाराष्ट्र शासन व विमाकंपन्या



यांची देण्याची नियत नाही त्या वेळस बीड जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर केला होता व पिक पैसे वारी पण ५० पैशाच्या आत म्हणजेच ३३ पैसेवारी होती म्हणजेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राहिलेला ७५% पिकविमा मिळणे गरजेचे असतांना पण विमाकंपन्या आणि महाराष्ट्र शासन यांचे मिलिभगत असल्यामुळे शेतकऱ्याला प्रति हेक्टरी ५ हजार रुपयाचे नुकसान भरपाईचे अनुदान देऊ म्हणत आहेत हे महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्याची चालवलेली शुध्द फसवणुक आहे अशी सगळी विदारक परिस्थिती बीड जिल्ह्याची असतांना जिल्ह्यातील मंत्री, आमदार पिक पाहणी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन करत आहेत. देणे ना घेणे काहीच नाही या करता भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने खालील मागण्यावर दिनांक- १९/०९/२०२४ गुरुवार रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता चुंबळी फाटा या ठिकाणी चक्काजाम आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. १)बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाईचे प्रती हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देऊन विमा वाटप करा., २)सन- २०२३ चा खरीप ७५ % राहिलेला पिक विमा त्वरीत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा., ३)सन- २0२० चा खरीप पिक विमा महाराष्ट्र शासन व विमा कंपन्याच्या मिलिभगत मुळे जो आडुन ठेवलेला आहे तो त्वरीत द्यावा., ४)शेतकऱ्याकडील सर्व बँकाचे थकीत पिक कर्ज त्वरीत माफ करुन नव्याने कर्ज वाटप करा., ५)सर्व सामान्याच्या घरात अंधार करणारी स्मार्ट इलेक्ट्रीक मीटरची योजना रद्द करा., ६)६० वयोवर्षावरील शेतकऱ्यांना प्रतिमहा ५ हजार रुपये पेन्शन त्वरीत द्या., ७)संजय गांधी, श्रावणबाळ, विधवा महिला, परितक्त्या यांना प्रतिमहा ५ हजार रुपये मानधन द्या. या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर महाराष्ट्र राज्य किसान सभा उपाध्यक्ष कॉ.महादेव नागरगोजे, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रवादी काँग्रेस आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे, भाकप पाटोदा शाखा सेक्रेटरी कॉ.भगवान जावळे, भाकप शाखा सेक्रेटरी चुंबळी कॉ.सुधाकर सिरसट, शेतकरी नेते चक्रपाणी जाधव, किसान सभेचे भगवान पवळ, माजी सरपंच चुंबळी सुखदेव नागरगोजे, कॉ.नामदेव नाईकवाडे, माजी सरपंच चुंबळी रामराव गोंदकर, माजी ग्राम पंचायत सदस्य चुंबळी दिनकर नागरगोजे, जनशक्ती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र खाडे, शेख ईलीयास बादशाह, आबासाहेब भोसले, भारत घुमरे, राजेंद्र जायभाये, पद्माकर बिनवडे, लिंबाजीराव मुंढे, हरिभाऊ शिंदे, जलाल मोमीन, उत्तरेश्वर घुमरे यांच्या सह आदीच्या सह्या आहेत.

# मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा ०३ अंतर्गत ग्रामीण भागातील ५० किलोमीटर रस्त्यांच्या कामांना मंजुरी

### आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रयत्नांना यश




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा ०३ अंतर्गत रस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यात आली. माननीय आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या प्रयत्नाने खालील रस्त्यांना मंजुरी देण्यात आली.

१)घोरदरी,ता.सेनगाव जोडरस्ता ते सरहद्द-०५ ज्ञा
२)खरबी ता.हिंगोली जोडरस्ता - ००.८० km
३) जामठी खुर्द ता.हिंगोली जोडरस्ता-०१ km
४)हट्टा ते भंडारी तांडा,ता.सेनगाव जोडरस्ता-०३ km
५)पानकन्हेरगाव ते खैरखेडा प्रजीमा २५ पर्यंत-०४ km
६) जयपूरवाडी ता.हिंगोली जोडरस्ता-०१km
७)सुलदली खुर्द ते वटकळी ता.सेनगाव जोडरस्ता-०१.५० km
८) सालेगाव ता.सेनगाव,जोडरस्ता- ०१km
९)नागमाथा,गोरेगाव,ता.सेनगाव जोडरस्ता ०१.२००
१०)राहोली बु. ता.हिंगोली जोडरस्ता -०२km
११)बरडा पिंपरी, ता.सेनगाव जोडरस्ता ०१.२०० km
१२) वझर ता.सेनगाव,जोडरस्ता ०२.२०० km
१३) दाताडा बु. ते वाघजाळी ता.सेनगाव जोडरस्ता-२.५००km
१४) चिंचखेडा ता.सेनगाव जोडरस्ता ३.२००km
१५)वाढोणा ते कंकरवाडी जिल्हा सरहद्दीपर्यंत ०२km
१६)कहाकर बु. जोडरस्ता ०१.५०ज्ञा १७)बरडा ता.सेनगाव जोडरस्ता ०.८५० km
१८) कोंडवाडा ता.सेनगाव जोडरस्ता १.२००
१९) सिनगी खांबा ते उटी जोडरस्ता ०६ km
२०)भांडेगाव ते खंडाळा जोडरस्ता ०३km
२१)मौजे केसापूर जोडरस्ता १.५०० km

अशा आशियाचे पत्र उपसचिव महाराष्ट्र शासन यांनी नुकतेच कार्यकारी अभियंता हिंगोली यांना दिले. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस साहेब यांनी गणेश उत्सवाची भेट गावकऱ्यांना दिल्या बद्दल आमदार मुटकुळे साहेबांनी त्यांचे व महायुती शासनाचे आभार व्यक्त केले.

# हिंगोली विधानसभेतील अनेक गावांसाठी दोन कोटी निधी मंजूर

### रामदास पाटील सुमठाणकर यांच्या प्रयत्नाला यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



हिंगोली विधानसभेतील अनेक गावांसाठी ग्रामविकास विभाग अंतर्गत २५ १५ मधून एकूण २२ गावांना दोन कोटी निधी मंजूर झाल्याने रामदास पाटील सुंमठणकर यांनी मानले गिरीश महाजन यांचे आभार हिंगोली विधानसभेतील काही भागांतील गावांचा रामदास पाटील सुंमठणकर यांनी पाठपुरावा करून आराखडा सादर केला होता त्या आराखडा नुसार हिंगोली विधानसभेतील २२ गावांना दोन कोटी निधी मंजूर झाला असून मा, ना गिरीश महाजन यांचे आभार रामदास पाटील सुंमठणकर यांनी मानले,

# परमेश्वर इंगोले यांना सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



सेनगांव तालुक्यातील जवळा बुद्रुक येथील रहिवासी असलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस परमेश्वर इंगोले यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर झाला आहे. गोरगरीब सर्वसामान्य व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत अनेक वेळा आवाज उठवुन न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न परमेश्वर इंगोले यांनी केला असून त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त यशवंत संघर्षेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सन २०२४ चा सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर झाला आहे. दिनांक ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता स्वर्गीय शिवाजीराव देशमुख सभागृह हिंगोली या ठिकाणी सदर पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती परमेश्वर इंगोले यांनी आज दिनांक १० सप्टेंबर रोजी दिली आहे.

# शेतकरी नेते मारोती गीते यांना सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

(नागा) सिंनगी येथील रहिवासी असलेले शेतकरी नेते मारोती गीते यांना यशवंत संघर्ष सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर केला असून हा पुरस्कार वितरण सोहळा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त हिंगोली या ठिकाणी पुरस्कार सन्मानित केल्या जाणार आहे शेतकरी नेते मारोती गीते यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत असून व शेतकऱ्याच्या हित हितासाठी सदैव प्रयत्न करतात याच अनुसंघाने यशवंत संघर्ष सेना यांच्याकडून सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर झाला असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा मिळत आहेत.

# जाफराबाद येथे न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रम संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जाफराबाद । प्रतिनिधी**




सविस्तर वृत्त असे की, जाफराबाद येथे दिनांक ९ सोमवार रोजी सायंकाळी आमदार संतोषभाऊ दानवे यांनी आयोजीत केलेला कार्यक्रम न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या अंतर्गत प्रसिद्ध अभिनेते क्रांती मळेगांवकर यांनी न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमात सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून पुढील कार्यक्रमात सुरुवात केली. त्यानंतर गणेश गीत गायन करुन गणेशाला वंदन केले. पुढील कार्यक्रम त्यांनी खुप मोठे मनोरंजन करत असताना महिलांना स्पर्धा घेतल्या त्यामध्ये नृत्य, बलुल(फुगे) तोडणे, जम्प घेणे, पारंपरिक फुगडी, ६०वर्ष वयातील महिलांसाठी चालणे, अशा अनेक स्पर्धा घेतल्या यामधून स्पर्धक निवडले. त्या स्पर्धकांना माननीय आमदार संतोषभाऊ दानवे, निर्मलाताई दानवे , रेणुताई दानवे, आशाताई पांडे, संजना जाधव आणि इतर मान्यवर यांच्या हसते ५१ पैठण्या वाटप करण्यात आल्या. आणखी बक्षिसामध्ये फ्रिज, एल.इ.डी.टी.व्ही. पिठाची गिरणी, वाटप करण्यात आले. या कार्यक्रमामुळे महिलांमध्ये खूप उत्साह पहावयास मिळाला . काही महिलांनी बोलतांना सांगितले की संतोषभाऊ यांनी असेच कार्यक्रम नेहमी आयोजीत करावे महीला त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या आहोत .

# तलावाकाठावरील वीज पंपातील तांब्याच्या तारांची चोरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

तालुक्यातील राजेगाव तलावाकाठावरील सुमारे तेरा शेतकऱ्यांच्या वीज पंपातील तांब्याच्या तारा अज्ञात चोरट्यांनी काढून नेल्याची घटना आज दि.०९ सप्टेंबर, सोमवारी सकाळी उघडकीस आली आहे. या प्रकरणी साखरखेर्डा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे

**शेंदूरजन-राजेगाव तलावातील घटना**

तालुक्यातील शेंदूरजन व राजेगाव दरम्यान तलाव आहे. अनेक वर्षांपासून परिसरातील गावांमधील शेतकरी ह्या तलावातून वीज पंपाद्वारे पाणी उपसून पिकांचे सिंचन करतात. त्यासाठी तलावात व काठावर वीज पंप ठेवलेले असतात. वीज वितरण कंपनीच्या जोडणी तेथेच आहेत. दरम्यान काल दि. ०८ सप्टेंबर रविवारी रात्रीतून काठावर असलेले वीज पंपांचा पुरवठा खंडित करुन व वीज पंप उघडून त्या प्रत्येक पंपातील तांब्याची तार अज्ञात चोरट्यांनी काढून नेली. ही घटना आज दि.०९ सप्टेंबर, सोमवारी सकाळी ८.०० वा. सुमारास गोपाल बोरकर या शेतकऱ्याच्या लक्षात आली. यासंदर्भात भ्रमणध्वनी व समाज माध्यमातून माहिती मिळाल्याने जवळपास सर्व शेतकऱ्यांनी तलाव गाठला. त्यावेळी शेंदूरजन व जागदरी येथील शेतकऱ्यांनी तलावाजवळ धाव घेतली यावेळी अनेक शेतकऱ्यांच्या विद्युत पंपातील तांब्याच्या तारा ची चोरट्यांनी चोरी केली असून मोटारीचे अनेक पार्ट तोडून टाकल्याचे निदर्शनास आले आहे यावरून गोपाल भोलेश्वर बोरकर वय ३५ वर्ष धंदा शेती रा शेंदुरजन ता सिं राजा जि बुलढाणा यांनी पोलिस स्टेशन साखरखेर्डा येथे हजर येवुन रीपोर्ट दिला की माझी शेंदुरजन शिवारात शेती असुन ग्राम जागदरी तळ्यावरुन नी पाइपलाइन केलीली असुन पाण्यामधे इलेकट्रीक मोटार टाकुन पंपादवारे शेती वहीती करतो. माझे सोबत इतर शेतकरी यांनी सुधा इलेक्ट्रीक मोटार पंप जागदरी तलावात टाकले आहे. काल दि. ०८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ०६/०० वाजता पर्यंत शेंदुरजन शिवारातील शेतात फेर फटका मारुन घरी परत आलो.

दि. ०९ सप्टेंबर रोजी मी सकाळी ०९/०० वा सुमारास माझे शेतात गेलो व नंतर मी धरणावर गेलो असता मला माझे शेताजवळील शेतकयांची गर्दी दिसली.



तेथे तलावातील इलेक्ट्रीक मोटार पंपाची तोडफोड करुन नुकसान केलेले दिसले व त्यामधील ताब्याची तार काढुन चोरुन नेली आहे त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे माझी. १) टेक्सन कंपनीची ७.५ क्ड्ढ ची मोटारपंपाची नग १ ताब्याची तार ३ किमती ५०००/-रु, २) मुरलीधर रामदास शिंगणे यांची टेक्समो कंपनीची ७.५ क्ड्ढ ची मोटारपंपाची नग १ ताब्याची तार अं किमती ५०००/- रु ३ ) दिनकर सखाराम पळसकर टेक्समो कंपनीची ७.५ क्ड्ढ ची मोटारपंपाची नग १ ताब्याची तार अं किमती ५०००/- रु ४) गजानन मधुकर वायाळ टेक्समो कंपनीची ५.० क्ड्ढ ची मोटारपंपाची नग १ ताब्याची तार अंकिमती ५०००/- रु. ५) भागवत मधुकर तेलंग, टेक्समो कंपनीची ५.० क्ड्ढ ची मोटारपंपाची नग १ ताब्याची तार अं किमती ३०००/-रु, ५) समाधान संपतराव डोळे टेक्समो कंपनीची १२.५ क्ड्ढ ची नग १ ताब्याची तार किमती ६०००/ रु ७) भानदास पुंजाजी डोळे यांची टेक्समो कंपनीची ७.५ क्ड्ढ ची नग १ ताब्याची तार किमती ५०००/- रु ८ ) शिवहरी उंकडा कुटे यांची टेक्समो कंपनी ची १०. क्ड्ढ ची नग १ ताब्याची तार किमती किमती ६०००/- रु९) सिद्धेश्वर लक्ष्मण खेडेकर यांची उठ्ख कंपनीची ७.५ क्ड्ढ ची मोटारपंपाची नग १ ताब्याची तार अंकिमती ५०००/- रु, १०) समाधान तुळशीदास पळस यांची जढ- कंपनी ची ७.५ क्ड्ढ ची मोटारपंपाची नग १ ताब्याची तार अं किमती ५०००/- रु ११ ) आश्रु आनंदा कंकाळ टेक्समो कंपनीची ७.५ क्ड्ढ ची मोटारपंपाची नग १ ताब्याची तार अं किमती ५०००/- रु १२) बबन सखराम नागरे यांची टेक्समो कंपनी ची १०. क्ड्ढ ची नग १ ताब्याची तार किमती किमती ६०००/-रु. १३) अमोल रामभाउ कोल्हे यांची टेक्समो कंपनी ची १०. क्ड्ढ ची नग १ ताब्याची तार किमती किमती ६०००/ असा एकूण किमत ६६,०००/- रु चा कोणीतरी अज्ञात चोरटयाने जागदरी तलावातील इलेकट्रीक मोटार पंपाची तोडफोड करुन नुकसान केले आहे सदर तक्रारी वरून साखरखेर्डा पोलीसांनी भारतीय न्याय सहीता २०२३ नुसार ३०३(२),३२३(४),३२३(५) नुसार गुन्हा दाखल केला असून सदर प्रकरणी ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमदार रामदास हिम्मत वैराळ पुढील तपास करीत आहेत

असे सांगण्यात आले आहे.

चोरटे हे विद्युत व वीज पंपाचे जाणकार असावेत अशी चर्चा यावेळी शेतकऱ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे.

# गावंडे महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर

## शिबिरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**





उमरखेड येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाचे संजीवक कै. डॉ. आत्मारामजी गावंडे यांचा जन्म दिवस 'कृतज्ञता दिन' (थँक्स गिव्हिंग डे) म्हणून विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.सोमवारी रोजी गावंडे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथक, इनरव्हील क्लब व रोटरी क्लब व आर.आर.सी. क्लब, उमरखेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी नेत्र चिकित्सा, दंत चिकित्सा आणि विद्यार्थी व नागरिकांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्त संकलन करण्यासाठी नांदेडच्या जिजाई रक्तपेढीचे सहकार्य लाभले.

यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर, संस्थेचे सचिव डॉ. यादवराव राऊत, साहेबराव कांबळे, रोटरी क्लबचे डॉ. व्यवहारे, प्रा. प्रकाश देशमुख, केतन महेश्वरी, डॉ. कृष्णा नाईक व राम सारडा,सुरेंद्र कोडगीरवार उपस्थित होते. इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष, सौ.आशाताई देवसरकर, कुसुम गिरी, रोहिणी चक्करवार व इतर पदाधिकारी,गावंडे महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत १०० विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. उमरखेड येथील दंतरोग तज्ज्ञ डॉ. विक्रांत भोसकर यांचे सहकार्य लाभले.

यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य राम देवसरकर, सचिव डॉ. यादवराव राऊत आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात सर्व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव बा. कदम, उपप्राचार्य डॉ. व्ही. पी. कदम, डॉ. डी. व्ही. तायडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पी. एम. गुजर, पर्यवेक्षक प्रा. बी. यु. लाभसेटवार, प्रा. एस. बी. वाघमारे,अधीक्षक साहेबराव कांबळे, गजानन देवसरकर, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. प्रशांत अनासाने, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. एस. एस. इंगळे तसेच एन.सी.सी चे कॅप्टन प्रा. एस. एस. पाचकुडके, प्रा. अभय जोशी, प्रा. एस. व्ही. सुर्वे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. डॉ. माधव कल्याणकर , डॉ. आर. जे. डहाके, श्री. जी. एन. सादूडे , श्री. रामेश्वर बावस्कर, श्री. व्ही. आर. पोटे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग होता. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रम व शिबिरांच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# आष्टीच्या नवीन तहसीलदार वैशाली नेमगोंडा पाटील यांनी स्वीकारला पदभार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**




नागपूर येथील वैशाली नेमगोंडा पाटील यांनी आष्टी तहसीलदार चा पदभार स्वीकारला आहे. येथील तहसीलदार प्रमोद गायकवाड यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी नियुक्ती मिळालेल्या तहसीलदार वैशाली नेमगोंडा गेल्या दिड महिन्यांपासून रुजू न झाल्याने आष्टी तहसीलदारांचे पद रिक्त होते.यामुळे नागरिकांची कामे

खोळंबली असून प्रचंड गैरसोय होत होती.शुक्रवार दि.६ रोजी दुपारी ३ वा.नागपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या वैशाली नेमगोंडा पाटील यांनी आष्टी तहसीलदार पदाचा पदभार स्वीकारला आहे. त्यांनी यापूर्वी धारूर, माजलगाव,येथे तहसीलदार पदावर काम केले आहे.

आष्टीच्या नवीन तहसीलदार वैशाली नेमगोंडा पाटील यांनी आष्टी तहसीलदार पदाचा पदभार स्वीकारला आहे.

म्हणून त्यांचा सन्मान करताना आष्टी चित्रदर्शनचे पेपरचे उपसंपाद तथा व्हॉइस ऑफ मीडियाचे तालुका उपाध्यक्ष,दै.लोकमंथन दै.प्रभास केसरी,दै.लोकनेता न्यूज नेटवर्क चे आष्टी तालुका,बीड जिल्हा प्रतिनिधी तथा पुरोगामी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष अण्णासाहेब साबळे,झुंज मराठी न्यूज चे संपादक संदिप जाधव यांच्यासह आष्टी तालुक्यातील विविध क्षेत्रातील लोकांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आहे.

# संजय गांधी निराधार योजनेचा लाभ गोर गरिबांना मिळावुंन द्या-बाळासाहेब देशमुख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । प्रतिनिधी**




भोकरदन तालुक्यामध्ये बऱ्याच गावामध्ये संजय गांधी निराधार तसेच शासनाच्या इतर योजनांमध्ये गोरगरीब व गरजवंतांना डावलून धन दांडगे दहा पाच एकर शेती असणाऱ्यांना राजकीय हेतूतून संजय गांधी निराधार तसेच इतर योजनांचा लाभ घेत आहेत. आणि रोज मंजुरी करणारी भूमिहीन तसेच भूमिहीन विधवा अशा महिला शासकीय अनुदानापासून वंचित आहे. शासनाने नियमाप्रमाणे अनुदान शासन बरोबर देते परंतु यांची वशिलेबाजी मुळे सर्वसामान्य गोरगरीब तसेच गरजवंत लाभार्थ्यांना त्यांचा लाभ मिळत नाही व ते वंचित राहतात तो लाभ त्यांना मिळवा हा शासनाचा हेतू आहे. तो साध्य होईल खऱ्या गोरगरीब भूमीहीन लाभार्थ्यावर असाच अन्याय होत राहिल्यास तहसील कार्यालया समोर अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.निवेदन देताना अखिल भारतीय भ्रष्ट्राचार निर्मूलन संघर्ष समिती चे तालुका अध्यक्ष बाळासाहेब देशमुख ,उपाध्यक्ष सुनील उंबरकर ,तालुका सचिव डीगू अण्णा जाधव देशमुख, भोकरदन तालुका सल्लागार पंजाबराव सपकाळ उपस्थीत होते.

# सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे मानव विकास मिशन अंतर्गत सायकल वाटप









■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

आज दिनांक १०सप्टेंबर २०२४रोज मंगळवार रोजी सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल लोणार येथे मानव विकास मिशन अंतर्गत सायकल वाटप करण्यासाठी स्टेट बँक लोणार पासून सायकल ची भव्य रॅली लेझिम पथक बँड सह रॅली काढून शाळेच्या भव्य प्रमाणात लोणार पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी आदरणीय जंगल सिंग राठोड सर तसेच महिला विकास महामंडळाच्या अध्यक्ष श्रीमती उषा ताई फड,तसेच संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष श्री.गिरिधर भाऊ ठाकूर,शाळेचे मुख्याध्यापक श्री.डोळे भाऊसाहेब व पर्यवेक्षक सांगळे सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू भगिनी यांनी व्यवस्थित नियोजनातून हा कार्यक्रम संपन्न केला.

# धर्माबाद तालूका सरसकट ओला दूष्काळ जाहीर करा-मारोतराव कवळे गूरुजी






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

धर्माबाद तालुक्यात सतत झालेल्या पावसामुळे सोयाबीन, कापुस, मुग, उडीद, तुर आदी पिकांच्या झालेल्या नुकसान भरपाई पोटी सरसकट आर्थीक मदत देण्याबाबत चे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.. धर्माबाद तालुक्यात १ सप्टेंबर ते १० सप्टेबर पर्यंत झालेल्या सतत च्या पावसामुळे शेतातील सोयाबीन, कापुस, मुग, उडीद, तुर व आदी पिके उध्वस्त झाली. तरी आपण ९हजार ५६२ हेक्टर क्षेत्र बाधीत ग्रहीत धरले आहे तसे न करता १०० टक्के २८ हजार ९९७ हेक्टर क्षेत्रा पुर्ण पणे बाधीत झालेले आहे. सततच्या पावसामुळे शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई देणे ग्राहय आहे. या वर्षामध्ये निसर्गाच्या अवक्रपेने शेतकरी महासंकटात सापडला आहे. तसेच निसर्गाच्या अवक्रपेमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट १०० टक्के खरीप पिक विमा मंजुर करण्यासाठी पिक विमा कंपनीला आदेशीत करावे, व धर्माबाद तालुक्यातील शेतक-यांना शासन निर्णया प्रमाणे तात्काळ नुकसान भरपाई देण्याचे पत्र आज तहसिलदार यांना देण्यात आले.धर्माबाद तालुक्यात सतत झालेल्या पावसामुळे सोयाबीन, कापुस, मुग, उडीद, तुर आदी पिकांच्या झालेल्या नुकसान भरपाई पोटी सरसकट आर्थीक मदत देण्याबाबत चे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.. धर्माबाद तालुक्यात १ सप्टेंबर ते १० सप्टेबर पर्यंत झालेल्या सतत च्या पावसामुळे शेतातील सोयाबीन, कापुस, मुग, उडीद, तुर व आदी पिके उध्वस्त झाली. तरी आपण ९हजार ५६२ हेक्टर क्षेत्र बाधीत ग्रहीत धरले आहे तसे न करता १०० टक्के २८ हजार ९९७ हेक्टर क्षेत्रा पुर्ण पणे बाधीत झालेले आहे. सततच्या पावसामुळे शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई देणे ग्राहय आहे. या वर्षामध्ये निसर्गाच्या अवक्रपेने शेतकरी महासंकटात सापडला आहे. तसेच निसर्गाच्या अवक्रपेमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट १०० टक्के खरीप पिक विमा मंजुर करण्यासाठी पिक विमा कंपनीला आदेशीत करावे, व धर्माबाद तालुक्यातील शेतक-यांना शासन निर्णया प्रमाणे तात्काळ नुकसान भरपाई देण्याचे पत्र आज तहसिलदार यांना देण्यात आले.

# पूरग्रस्तांसाठी लायन्स इंटरनॅशनलच्या वतीने दहा हजार डॉलरची मदत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



पुरग्रस्तासाठी लायन्स इंटरनॅशनल च्या वतीने दहा हजार डॉलर्स ची मदत मिळाली असून भांडे,धान्य व कपडे, छत्री सह अठरा वस्तूंचा समावेश असलेल्या लायन्स सहायता किट वाटपाचा शुभारंभ मनपा आयुक्त डॉ. डोईफोडे आणि लायन्स प्रांतपाल गिरीश सिसोदिया यांच्या हस्ते नलागुटाचाळ इथे करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर उपप्रांतपाल प्रथम आश्विन बाजेरिया, उपप्रांतपाल द्वितीय राहुल औसेकर, प्रांत सचिव रितेश छोरिया, रीजनल चेअर पर्सन तथा प्रोजेक्ट चेअरमन रवी कडगे, कॉर्डिनेटर ड. दिलीप ठाकूर हे उपस्थित होते. प्रास्ताविक करताना रवी कडगे यांनी पूरग्रस्तांना मदत करण्यासंदर्भात लायन्स परिवाराची भूमिका विशद केली. डॉ. डोईफोडे यांनी आपल्या भाषणातून पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे करणाऱ्या लायन्स परिवाराचे कौतुक केले. लायन्स प्रांतपाल सिसोदिया यांनी लायन्स तर्फे घेण्यात येणाऱ्या विविध सेवा प्रकल्पाची सविस्तर माहिती यावेळी दिली. अश्विन बाजेरिया व राहुल औसेकर यांची समायोचित भाषणे झाली. प्रातिनिधिक स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते २५ पूरग्रस्तांना लायन्स सहायता किटचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी लायन्स क्लब नांदेड च्या मिड टाऊन वतीने तयार करण्यात आलेल्या राम रक्षा किटचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी तर आभार झोन चेअरपर्सन गंगाबिषण कांकर यांनी मानले. कार्यक्रमाला पूर्व प्रांतपाल जयेश ठक्कर, दिलीप मोदी, नारायण कलंत्री, ड.प्रवीण अग्रवाल यांच्यासह नांदेड मेन लायन्स क्लब, नांदेड मिडटाऊन, नांदेड सेंट्रल, नांदेड प्राईड, नांदेड एंजल्स व लिओ क्लबचे अनेक सदस्य उपस्थित होते. त्यानंतर लायन्स प्रांतपाल सिसोदिया यांच्या हस्ते रयत रुग्णालयात रुग्णांना लायन्सचा डबा व रयत रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना कृपाछत्र उपक्रमांतर्गत छत्र्या वाटप करण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी झोन चेअर पर्सन शिवा शिंदे व पारुल जैन, सदाशिव महाजन, शिवाजी पाटील, मनीष माखन, मोहन देशमुख, नीलम कासलीवाल, ज्योती जांगिड, विजय होकर्णे, गौरव दंडवते, दीपेश छेडा, व्यंकटेश पंजाला, सत्यनारायण शिवरात्री यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904